## शैक्षणिक वर्ष 2017-18 च्या प्रवेश परिक्षा अर्ज भरण्यासाठीच्या सुचना

1. **ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत : 17 ऑक्टोबर ते 18 नोव्हेंबर 2016**

2. पुर्ण भरलेले अर्ज सैनिक स्कूल सातारा यांचे कार्यालयात जमा करण्याचा दिनांक व वेळ - **दि. 30 नोव्हेंबर 2016 दुपारी 05.00 वाजेपर्यंत. उशिरा येणारे सर्व अर्ज नाकारण्यात येतील याची नोंद घ्यावी. उशिरा आलेल्या किंवा अपूर्ण अर्जासंदर्भात कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.** शाळेचे माहितीपत्रक शाळेच्या वेबसाईटवर **(www.sainiksatara.org) pdf** फॉरमॅटमध्ये उपलब्ध आहे.

3. **माहितीपत्रक व प्रवेशअर्ज दरपत्रकः**

**(अ) सामान्य, संरक्षणदल, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग, विशेष मागासवर्ग उमेदवारांसाठी** **रूपये 450/-**

**(ब) अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती मधील उमेदवारांसाठी** **रूपये 300/-**

**माहितीपत्रक व प्रवेशअर्जाची फी ही फक्त डिमांडड्राफ्टद्वारेच स्विकारली जाईल.** फक्त राष्ट्रीयकृत बँकेतून काढलेला व "प्रिंन्सिपाल, सैनिक स्कूल सातारा" **(The Principal, Sainik School, Satara)** यांचे नावे असलेला व सातारा **(Satara)** येथील शाखेवर काढलेला योग्य रकमेचा डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत जोडावा. **चुकीचा डिमांडड्राफ्ट स्विकारला जाणार नाही व अशा चुकीच्या डिमांडड्राफ्टमुळे विद्यार्थ्याची उमेदवारी रद्द केली जाईल. तसेच यासंदर्भात कोणत्याही वेळी कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

4. **अर्जासोबत 10 इंच X 12 इंच आकाराचे स्वतःचे नाव व पुर्ण पत्ता लिहिलेले व पोस्टाची 40/- रूपये किमतीची तिकीटे चिकटवलेले क्लॉथबाऊंड / प्लास्टिक कोटेड पाकिट जोडावे ज्यातून आपणास नमुना प्रश्नपत्रिका पाठविली जाईल.**

5. महाराष्ट्र वगळता इतर राज्यातील उमेदवारांचा समावेश सामान्यवर्गामध्ये केला जाईल.

6. (अ) **अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीमधील उमेदवारांनी त्यांच्या जातीच्या दाखल्याच्या दोन प्रती प्रवेशअर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे. उमेदवाराच्या वडिलांचा / आईचा / पालकांचा जातीचा दाखला स्विकारला जाणार नाही. VJ/NT/OBC/SBC या जातीतील मुलांचा समावेश सामान्यवर्गामध्ये केला जाईल.**

(ब) अनुसूचित जाती किंवा जमातीमधील उमेदवाराकडे जातीचा दाखला नसल्यास तो सामान्यवर्गामधून प्रवेशपरिक्षा देवू शकतो. त्यासाठी त्याने रू. 450/- चा डिमांडड्रफ्ट जोडणे आवश्यक आहे. यासंदर्भात सदरच्या उमेदवाराने भविष्यामध्ये त्याचा जातीचा दाखला यावर्षीच्या प्रवेशपरिक्षेच्या संपूर्ण कालावधीमध्ये जरी शाळेला सादर केला तरी त्याची कॅटेगरी सामान्यावर्गातून अनुसूचित जाती किंवा जमातीमध्ये बदलली जाणार नाही व जास्तीची रक्कम परत दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

7. जर उमेदवार संरक्षणदल (आर्मी/नेव्ही/एअरफोर्स)या कॅटेगरीमधून प्रवेशपरिक्षेला बसणार असल्यास खालील बाबींची पुर्तता करावीः -

(अ) संरक्षणदलातून निवृत्त झालेल्या पालकांचे डिस्चार्ज सर्टीफिकेटची सांक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

(ब) संरक्षणदलामध्ये कार्यरत असलेल्या पालकांनी त्यांचे वरिष्ठांचा दाखला (सर्व्हिंग सर्टीफिकेट) तसेच उमेदवाराच्या जन्मतारखेचा उल्लेख असलेल्या Part II ची सांक्षांकित प्रत अर्जासोबत जोडावी.

8. **कोणत्याही शाळेमार्फत अथवा कोचिंग क्लासतर्फे अथवा व्यक्तीकडून एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास ते स्विकारले जाणार नाहित व सदरचे सर्व अर्ज रद्द केले जातील तसेच** सर्व डिमांड ड्राफ्टची रक्कम जप्त केली जाईल **याची नोंद घ्यावी.**

9. **पुर्ण भरलेले प्रवेशपरिक्षा अर्ज फॅक्स अथवा ई-मेलद्वारे पाठवू नयेत तसेच असा अर्ज पाठाविल्यास तो स्विकारला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

10. प्रवेशपरिक्षेसाठीची प्रवेशपत्रे ही संबंधित पालकांना पोस्टाने पाठविली जातील. संबधित उमेदवाराकडे प्रवेशपत्र नसल्यास त्याला प्रवेशपरिक्षेला बसू दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी म्हणून सर्व पालकांनी त्यांचा योग्य व पुर्ण पत्ता पाकिटावर लिहावा.

11. लेखी प्रवेशपरिक्षेमध्ये मेरिटप्रमाणे ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांना वैद्यकिय चाचणीसाठी व मुलाखतीसाठी पोस्टाने कळविले जाईल.

12. पालकांकडून जे वार्षिक उत्पन्न जाहिर केले जाईल त्याची शहानिशा शासनाकडून केली जाईल.

13. प्रवेशपरिक्षा अर्ज हा चार पानांचा आहे. Candidate's Information Form हे पाचवे पान आहे. प्रवेशपरिक्षा अर्ज A4 पेपरवरच प्रिंट करावा. सर्व पाचही पाने वेगवेगळया पानांवर प्रिंट करावी. पाटपोठ प्रिंट काढू नये. Candidate's Information Form भरून प्रवेशअर्जासोबत जोडावा.

14. **अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रांची यादी : - [ परिच्छेद कमांक 14 (क) ते 14 (झ ) यामधील सुचना काळजीपुर्वक वाचा व त्याप्रमाणे कारवाई करा ]**

**(क) पूर्ण भरलेला प्रवेशपरिक्षा अर्ज**

**(ख) परिच्छेद क्र.4 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे पाकिट**

**(ग) योग्य रकमेचा डिमांडड्राफ्ट (डिमांड ड्राफ्ट पाठविण्यापुर्वी पुढील गोष्टींची खातरजमा करावी (अ) डिमांड ड्राफ्टची छपाई स्पष्ट व सुवाच्य असावी (ब) त्यावर बँकेच्या अधिकाऱ्याची सही असणे गरजेचे आहे.( क) डिमांड ड्राफ्ट योग्य त्या किमतीचा असावा. (ड) डिमांड ड्राफ्ट सातारा येथील शाखेवर काढलेला असावा ).**

**(घ) उमेदवाराचे दोन फोटोग्राफ (3.5 cms x 4.5 cms) (फोटोग्राफच्या मागे उमेदवाराचे नाव लिहावे). दोन्ही फोटोग्राफ 14 (च) या परिच्छेदामध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही एका पाकिटामध्ये ठेवावेत.**

**(च) स्वतःचा योग्य पत्ता लिहलेली व पोस्टाची रू 5/- ची तिकिटे चिकटवलेली 9 इंच x 4 इंच आकाराची दोन पाकिटे (कृपया पाकिटावर पूर्ण व बिनचूक पत्ता लिहावा. सदरहू पाकिटांमधून आपणाला परिक्षेचे प्रवेशपत्र व वैद्यकिय चाचणी व मुलाखतीसाठीचे पत्र पाठविले जाणार आहे याची नोंद घ्यावी.)**

**(छ) परिच्छेद क्र.6 (अ) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे अनुसुचित जाती / जमातीमधील उमेदवारांचे जातीचे प्रमाणपत्र (दोन प्रती)**

**(ज) परिच्छेद क्र.7 मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे संरक्षणदलातील उमेदवारांनी योग्य ते दाखले जोडावेत**

**(झ) Candidate's Information Form**

**(ञ)** विद्यार्थ्याचे वडील अथवा आई हयात नसतील तर त्यांचे मृत्यूपत्र प्रवेशअर्जासोबत जोडावे.

**(ट)** विद्यार्थ्याचे वडील अथवा आई विभक्त असतील तर त्याचा सांभाळ करणाऱ्या व्यक्तीने (वडील / आई) योग्य ती न्यायालयीन कागदपत्रे प्रवेशअर्जासोबत जोडावीत. अशी कागदपत्रे सद्या आपणाजवळ नसतील तर अशी कागदपत्रे मुलाच्या प्रवेशावेळी जमा करेन असे घोषणापत्र शंभर रुपयाच्या स्टॅम्पपेपरवर तयार करून प्रवेशअर्जासोबत जोडावे.

**15. प्रवेश अर्जाच्या पान क्रमांक 1वर मुलाचा फोटो चिकटवावा व तो मुलगा सद्या शिकत असलेल्या शाळेच्या शिक्कयाने व मुख्याध्यापकांच्या सहीने सांक्षाकित करावा.पान क्र. 3 वर असणारे प्रमाणपत्र मुलगा सद्या शिकत असलेल्या शाळेच्या शिक्कयाने व मुख्याध्यापकांच्या सहीने सांक्षाकित करावे.**

**16. आपल्या पाल्याचा प्रवेशअर्ज सैनिक स्कूल सातारा यांचे कार्यालयात जमा करण्यापुर्वी तो दिलेल्या सुचनांप्रमाणे पुर्ण झाला आहे का याची खातरजमा करावी.**

17. वयाने जास्त अथवा कमी असणाऱ्या उमेदवारांचे अर्ज रद्द करण्यात येतील व यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही व जमा फी परत दिली जाणार नाही.

18. आपली उमेदवारी पुढील कारणास्तव रद्द केली जाऊ शकतेः - (अ) अपूर्ण भरलेले प्रवेशपरिक्षा अर्ज (ब) परिच्छेद 14 (क) ते 14 (**ट**) मध्ये उल्लेख केलेली व आपणास लागू असलेली कागदपत्रे न जोडल्यास.

19. **पान क्र. 1च्या सर्वात वर असणारा आपल्या प्रवेशअर्जाचा अनुक्रमांक लिहून / लक्षात ठेवावा.**

20. **शाळेचा पत्ता** - प्राचार्य, सैनिक स्कूल सातारा, सदर बझार, सातारा, पिन - 415 001, महाराष्ट्र